लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३१ वा | सोमवार, दि. १९ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▶ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▶फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▶प्रिंसेस ब्लाऊज ▶अरी वर्क ▶पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# संभाजी भिडे आधुनिक महाराष्ट्राचा सरडा

## सचिन खरात यांची जळजळीत टिका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मराठ्यांना उभा देश चालवायचाय, आरक्षण कुठे मागता? असं मत शिवप्रतिष्ठान संघटनेचे संस्थापक मनोहर भिडे यांनी मांडल्यानंतर आता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) चे सचिन खरात यांनी मनोहर भिडे यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. संभाजी भिडे आधुनिक महाराष्ट्राचा सरडा आहेत कारण सरडा हा वेळोवेळी गरजेनुसार रंग बदलत असतो असं म्हणत सचिन खरात यांनी भिडेंवर हल्लाबोल केला. तसेच आंतरावलीत मागील वर्षी जाऊन मराठा आरक्षणाला दिलेल्या पाठिंब्याची आठवणही सचिन खरात यांनी मनोहर भिडे याना करून दिली.



सचिन खरात म्हणाले, संभाजी भिडे यांनी मागच्या वर्षी आंतरावली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आणि मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला, मात्र आता याच संभाजी भिडे यांनी मराठा समाजाने आरक्षण का मागावे असं विधान केलं आहे. याच वरून ते आरक्षण विरोधी आणि बहुजन विरोधी असल्याचे दिसत आहे. आमचं तर स्पष्ट मत आहे कि संभाजी भिडे हे आधुनिक सरडा आहे, कारण सरडा हा वेळोवेळी गरजेनुसार रंग बदलत असतो त्यामुळे संभाजी भिडे हे आधुनिक महाराष्ट्राचा सरडा आहे अशी जळजळीत टीका सचिन खरात यांनी केली आहे.

### संभाजी भिडे नेमकं काय म्हणाले होते?

आज सांगली येथे पत्रकार परिषदेत बोलताना मनोहर भिडे यांनी मराठा आरक्षणावर भाष्य करत म्हंटल कि, मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे. पण वाघ सिंहाने मागावे का? विमान उडविण्याच्या प्रशिक्षणासाठी गरुडाने प्रवेश घ्यावा का? अशाच पद्धतीने मराठ्यांनी आरक्षण मागावे का? मराठ्यांना उभा देश चालवायचा आहे. आरक्षण कुठे मागता? सिंहानी जंगल सांभाळायचे असते. मराठा जात ही संबंध देशाचा संसार चालविणारी जात आहे, हे मराठ्यांच्या ज्या दिवशी लक्षात येईल, त्यादिवशी या मातृभूमीचे भाग्य उजळून जाईल. हे त्यांच्या लक्षात येत नाही, हे आपले दुर्दैव आहे असं भिडे म्हणाले.

### संभाजी भिडेंच्या मागे फडणवीसांचे शब्द आहेत - मनोज जरांगे पाटील

भिडेंना प्रत्युत्तर देताना जरांगेंनी फडणवीसांवर निशाणा साधला. हे शब्द देवेंद्र फडणवीस यांचे आहेत. याला-त्याला दोष देऊन उपयोग नाही. जंगल आमचं आहे ना, मग वाघ आरक्षणाची शिकार करणार. कशाला लागतंय आरक्षण, हे ज्या-ज्या संघटनेत पक्षात मराठ्यांची पोरं आहेत, त्यांना माहिती आहे. कारण त्या पक्षाचा किंवा संघटनेचा झेंडा उचलून तो आपल्या लेकरांचं बहीण-भावाचं कल्याण करू शकत नाही. त्यांना आरक्षण लागणार आहे, असे भूमिका जरांगे यांनी मांडली.देवेंद्र फडणवीसांमुळे भाजपपासून मराठा लांब चालला आहे. आता ह्यांच्यापासूनही जाईल. आम्हीही छत्रपतींच्या विचारांचे हिंदू आहोत. आम्ही आमचं आरक्षण मिळवू. देवेंद्र फडणवीस एक-एक अस्त्र काढत आहेत, आता हे नवीन अस्त्र काढलंय, अशी टीका जरागे यांनी केली.

# अजित पवारांना दाखवले काळे झेंडे

## देवेंद्र फडणवीसांनी तात्काळ खुलासा करण्याची अमोल मिटकरींची मागणी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा सुरु आहे. आज ही जनसन्मान यात्रा पुण्यातील जुन्नर भागात आयोजित करण्यात आली आहे. मात्र या जनसन्मान यात्रेपूर्वी भाजपच्या माजी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी अजित पवारांना काळे झेंडे दाखवले. यावेळी भाजपकडून अजित पवारांविरोधात जोरदार घोषणाबाजीही (पान 2 वर..)



### नेमकं काय घडलं?

विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदारांना आकर्षित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने जनसन्मान यात्रा सुरु केली आहे. अजित पवारांची जनसन्मान यात्रा आज जुन्नर तालुक्यात आहे. यावेळी भाजपाच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्ष आशा बुचके यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांनी अजित पवारांच्या जनसन्मान यात्रेला काळे झेंडे दाखवले. यावेळी त्यांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी देखील केली. जुन्नर तालुका हा पर्यटन तालुका असताना शासकीय कार्यक्रमात घटक पक्षांना डावललं जात असल्याचा आरोप भाजपाच्या माजी जिल्हा परिषद अध्यक्ष आशा बुचके यांच्यासह महिला कार्यकर्त्यांनी केला. तसेच अजित पवारांनी पालकत्वाची भूमिका पाळली नाही, याबद्दलही तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे नारायणगावात अजित पवारांच्या कार्यक्रमात काळे झेंडे दाखवल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच यावेळी मोठी घोषणाबाजीही करण्यात आली. यानंतर नारायणगावमध्ये आंदोलन करणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

### अमोल मिटकरी काय म्हणाले?

'जनसन्मान यात्रा हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा स्वतंत्र कार्यक्रम आहे. काळे झेंडे दाखवणाऱ्यांनी स्वतंत्र कार्यक्रम घ्यावा आणि आज जे काळे झेंडे दाखवले गेले, त्याबाबत देवेंद्रजीनी तात्काळ खुलासा करावा', असे ट्वीट अमोल मिटकरी यांनी केले आहे.

# पवारसाहेबांनी उमेदवारी दिली आणि निवडून आलो - धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** रणजितसिंह नाईक निंबाळकरांना भाजपाकडून तिकिट फायनल झाले त्यामुळे मतदार संघातील लोक नाराज झाले. मी मात्र जाम खुश झालो. कारण निंबाळकरांइतकी सोपी शिकार दुसरी भेटली नसती. या माणसाने मतदार संघात कामे केली नाहीत. चार आमदार सोडले तर इतर कोणाच्या संपर्कात नव्हता. सामान्य लोकांना हा माणुस आपला खासदार आहे हेच माहित नव्हते. असा माणुस निवडुन येईलच कसा. आम्ही पक्षाकडे उमेदवार बदलण्याची मागणी करत होतो. कारण आम्हाला हा उमेदवार निवडुन येण्याची खात्री वाटत नव्हती. मी स्वतः निवडणुक लढवण्यासाठी इच्छुक होतो. पण पक्षाकडे तिकिटाची मागणी केली नव्हती. पक्ष उमेदवार बदलत नसल्याने मी निवडणुक लढवण्याचे ठरवले. लोकांनी व कार्यकर्त्यांनी मला प्रचंड आग्रह केला. पण भाजपाने आम्हाला उमेदवारी दिली नाही, पवार साहेबांनी दिली. आणि मी निवडुन आल्याचे धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना अकलूज येथे सांगितले.



शिवरत्न शिक्षण संस्था आणि शिवरत्न परिवाराच्या वतीने खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा खासदार झाल्याबद्दल सत्कार समारंभ स्मृतीभवन अकलूज येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी खा. मोहिते-पाटील यांनी आपला संपुर्ण जिवनप्रवास उलगडून सांगितला. विजयदादांच्या हाताखाली धडे गिरवण्यापासून ते आज खासदार होईपर्यंत धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माहिती दिली. यावेळी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील, विश्वनाथ आवाड, धर्मराज दगडे, श्रीकांत राऊत, नितीन बनकर, अनिल जाधव, अश्रफ शेख, प्रशांत जगताप, पराग गायकवाड, हेमंत टेके, लाके, काटकर, सर्व शाखांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. खा. मोहिते-पाटील पुढे म्हणाले, कालच्या लोकसभा निवडणुकीमध्ये आमच्या विरोधकाने महसुल, पोलीस व इतर सर्व प्रशासकिय यंत्रणांचा गैरवापर केला. फोडाफोडी, दबाव, लालच यांचा वापर झाला. परंतु ती निवडणुक लोकांनी हाती घेतली होती. त्यांना अकार्यक्षम व्यक्ती नको होता. म्हणून माढा मतदार संघामध्ये लोकांनीच परिवर्तन घडवले. मी निवडुन आलो. आज माज्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. कारण या मतदार संघाचे नेतृत्व खुद्द शरद पवार व विजयदादा यांनी केले आहे. त्यांच्या तोडीस तोड काम करण्याचे दायित्व माज्यावर आपोआपच येऊन पडते आहे.

शिवरत्न परिवाराने मी खासदार व्हावा असा संकल्प केला होता. हा संकल्प पुर्ण करण्यासाठी त्यांनी अपार मेहनत घेतली. शिवरत्न युनिव्हरसिटी बनवण्याचे आमचे सर्वांचे स्वप्न आहे. ते लवकरच सत्यात उतरेल. संपुर्ण मोहिते-पाटील परिवार माज्या प्रचारासाठी माढा मतदार संघ पिंजुन काढत होता. माज्या पत्नीने मला मोलाची साथ दिली. माज्या मुलींनी माज्या प्रचारासाठी सोशल मिडीयाचा ताकदीने वापर केला. माज्या विजयसासाठी ज्यांनी हातभार लावला त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात शक्तींचा मी आभारी आहे. मला कधीही मागुन काही मिळाले नाही. सतत संघर्ष करावा लागला. उमेदीच्या काळात विजय प्रताप संघटना चालवण्यासाठी वेळप्रसंगी फटाके, वह्यापुस्तके विकून संघटना चालवली. जेव्हा लोकांनी ठरवले तेव्हाच मला पदे मिळत गेली. अकलूज गावचे सरपंचपद, माळशिरस पंचायत समितीचे सभापतीपद येथील नागरीकांच्या आग्रहास्तव मिळाले, मी झेडपीला जाण्याची इच्छा व्यक्त केली त्यावेळी राजकारणाची सोय म्हणून दुसऱ्याला संधी देण्यात आली. मला शिवामृतचे संचालक व्हायचे होते. तेव्हाही ते मिळाले नाही. त्यानंतर मी शिवामृतचा १२ वर्षे संचालक म्हणून काम केले. तेव्हा कुठे आता चेअरमन झालो. मतदार संघ राखिव असल्याने आमदार होता येत नव्हते. पण आता खुद्द जनतेनेच मला झेडपीतून संसदेत पाठवले आहे.

### सोन्याचे दिवस...

विजयदादा सत्तेत होते तेव्हा सोलापूर जिल्ह्याला सोन्याचे दिवस आले होते. कारण पुण्या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाचा निधी सोलापूर जिल्ह्याला मिळत होता. तेच सोन्याचे दिवस पुन्हा एकदा माढा मतदार संघासह सोलापूर जिल्ह्याला आणायचे आहेत.

### आणि शिक्कामोर्तब झाले...

विजयदादा मोहोळला राजन पाटलांकडे जाऊन बसले आणि सातपुतेंच्या पराजयावर शिक्कामोर्तब झाले. बीडचे पार्सल सोलापूरच्या लोकांनी घरी पाठवले, ज्यांनी मोहिते-पाटलांची साथ सोडली त्यांना जनतेने सोडल्याचा आजवरचा इतिहास आहे.

### टेन्शन आलं होतं...

खासदारकीची शपथ घेताना आणि संसदेतलं पहिलं भाषण करताना मला जाम टेन्शन आलं होतं. इतक्या दिग्गज लोकांपुढे आपल्याला बोलायला जमेल कि नाही ही शंका होती. पण नंतर विचार केला, ज्या लोकांनी मोठ्या विश्वासाने आपल्याना त्यांचा प्रतिनिधी म्हणून इथे पाठवलय त्यांच्यासाठी बोलावच लागेल. वेळप्रसंगी सरकारशी भांडावंही लागेल. त्यामुळे मोठ्या धाडसाने मी संसदेत पहिलं भाषण केलं.

# जिल्हाधिकाऱ्यांनी सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टीकोनातून केली पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होटगी रोड येथील विमानतळाची सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोचे अधिकारी सोलापूर येथे दाखल झालेले होते. ते विमानतळावरील सुरक्षेच्या दृष्टिकोनातून असलेल्या विविध बाबीची अत्यंत बारकाईने तपासणी केली असून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्यांना काही त्रुटी निदर्शनास आलेल्या असून त्याची पूर्तता करण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाला सुचित करण्यात आलेले आहे. (पान 2 वर..)






स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड
बहुउद्देशिय व संशोधन संस्था
संचलित
मोहोळ शहरातील पहिली आधुनिक अभ्यासिका
* वैशिष्ट्ये *
• वातानुकूलित सुसज्ज इमारत व प्रसन्न वातावरण
• मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था
• आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प
• प्रदुषणमुक्त वातावरण
• स्वतंत्र प्रसाधनगृह
• वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन
• शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
• दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
• प्रत्येक जागा आरक्षित
• मर्यादित प्रवेश क्षमता
• वाहन तळाची सोय
• दि. १६ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
• लॅपटॉप व मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट
• अभ्यासिकेत नोंदणी करणाऱ्या प्रथम १० विद्यार्थ्यांना शुल्कात १०% सूट
• संपर्कासाठी पत्ता •
बी.एन. गुंड कॉम्प्लेक्स, सोलापूर रस्ता, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
अभ्यासिकेची वेळ : स. ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत
मो. नं. 7038864753 / 9226517873



# एक राखी भारतीय सैनिकासाठी पंढरपुरातील नाईकनवरे परिवाराचा उपक्रम

**पंढरपुर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपुरातील नाईकनवरे परिवारांनी सीमेवरील सैनिकांना पाठवल्या हजारो राख्या.पंढरपुरातील संतपेठ भाईभाई चौक येथे राहणारे, समाजसेवक दिपक राजाराम नाईकनवरे यांनी एक राखी भारतीय सैनिकांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला, समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण करून दिला.



सैनिकाच्या योगदानातूनच संपूर्ण भारत देश सुखाने झोपू शकतो. आपल्या भारत मातेच्या सेवेसाठी दिवस रात्र आपल्या प्राणाची बाजी लावून प्रत्येक भारतीय जवान सीमेवर तैनात असतात,आणि सण असो वा आनंदाचा दिवस सैनिक सेवा हाच मोठा सण मानणारे सैनिक बंधू जवान आपल्या कुटुंबाची कोणतीही परवा न करता. दिवस-रात्र सीमेवर तैनात राहणारे,आपल्या भारत माता ची अखेरच्या श्वासापर्यंत सेवा करणारे हे सैनिक बांधव.

तसेच सैनिक बांधवांमुळे आपण आपल्या भारत देशातमध्ये ताट मानणे, जगू शकतो. प्रत्येक भारतीय जवानाचा आदर्श घेऊन आपण या नव्या पिढीने पुढे जाऊन भारत माता सुजलम सुफलम करण्याचं काम भारतीय जवान करतात. मी एक बहीण म्हणून आई म्हणून माज्या मुलाला किंवा भावाला अभिमानाने राखी बांधण्याचा हा आनंद मिळतो तो जगात कुठेही मिळत नाही.आज भारत मातेच्या जवानामुळे प्रत्येक युवक ऊर्जा मिळते.

तसेच त्यांनाही आपल्या प्रत्येक बहिणीची मायेचा प्रेमाचा ओलावा, अनुभवता यावा.

या जाणिवेतून एक राखी सैनिकासाठी ही संकल्पना मनात रुजवून पंढरपुरातील, सुनंदा राजाराम नाईकनवरे व त्यांच्या कुटुंबातील सर्वांनी लहानापासून ते वृद्धापर्यंत हजारो राख्या एकत्र करून सीमेवर पाठवण्यात आल्या.

आपल्या भारत मातेच्या सीमेवर आपला लहान भाऊ देशासाठी सीमेवर भारत मातेची सेवा करतात,आणि आम्ही त्यांची लाडकी बहीण त्यांना राखी बांधण्यास योग जरी येत नसेल तरी,आम्ही पोस्टद्वारे एक राखी सैनिकासाठी हा उपक्रम राबवतो. आणि सैनिकाच्या हातामध्ये बहिणीने राखी बांधल्याने त्यांच्या मनगटात बळ येथे आणि आपल्या देशासाठी प्रामाणिकपणे आपल्या देशाची रक्षा करण्यास बळ मिळते. म्हणून आम्ही नाईकनवरे परिवार जर त्या वर्षी सीमेवर हजारो राख्या पाठवण्याचं काम करतो. संतपेठ येथील नाईकनवरे परिवार हे आदर्श कुटुंब मानले जाते कारण त्यांचे वडील ज्येष्ठ समाजसेवक स्वर्गीय राजाराम महादेव नाईकनवरे यांचा वारसा त्यांची पत्नी व मुले पुढे चालवतात त्यांचा मोठा मुलगा मेजर विक्रम राजाराम नाईकनवरे व दिपक राजाराम नाईकनवरे, त्यांचे दोन मुलं नातू जावई सर्व नातेवाईक दादांचा वारसा जोपासतात.आणि समाजामध्ये एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मेजर विक्रम राजाराम नाईकनवरे हे सुद्धा सीमेवर कार्य करत आहे त्यांची मातोश्री सुनंदा राजाराम नाईकनवरे आपला मुलगा देश सेवेसाठी काम करतो हे मला अभिमान आहे.तसेच बहिणीकडून आपल्या जवानांना राख्या पाठवण्याचं काम करत.

पंढरपूर मधील नाईकनवरे कुटुंबाने सैनिकांना प्रती प्रेम आणि आपुलकी, नाते जोडलेले आहेत. व्यक्त करता, याही वर्षी प्रेमाचे प्रतीक असलेली राखी देशातील ९ युनिट मधील, जवानांना राख्या पाठवल्या आहेत.

तसेच आपल्या देशातील सैनिकांना प्रचंड मानसन्मान दिला जातो. तसेच हे नाईकनवरे कुटुंब प्रत्येक सामाजिक आपुलकीचे नाते जोडणारे कुटुंब आहे.

सदर हा कार्यक्रम. पंढरपूर पोस्ट ऑफिस येथे घेण्यात आला यावेळी अधिकारी सोमनाथ गायकवाड, विनोद धायगुडे, सपना सलगर, वैजनाथ महामुनी, शेख श्रीमती सुनंदा नाईकनवरे, दिपक नाईकनवरे राणी खंडागळे, व कर्मचारी शिपाई व विविध क्षेत्रातील मान्यवर संघटना कार्यकर्ते व महिला मंडळ पदाधिकारी उपस्थित होते ..

# महा मॅरेथॉन रॅलीला महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दाखवला हिरवा झेंडा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महसूल पंधरवड्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर व राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्या वतीने राज्यात उद्भवणाऱ्या विविध आपत्ती संदर्भात जनजागृती करण्यासाठी महा मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली श्री सिद्धेश्वर वनविहार ते विनायक सांस्कृतिक भवन पर्यंत आयोजित करण्यात आली होती. या रॅलीला आज सकाळी महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला.



यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, एनसीसी विभागाचे मेजर ठाकूर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, होमगार्ड विभागाचे इंगळे तसेच राज्य क्रीडा मार्गदर्शक, जिल्हा क्रीडा कार्यालय गणेश पवार, सुनील पवार उपस्थित होते.

या महा रॅली मॅरेथॉन मध्ये दयानंद कॉलेज, वालचंद कॉलेजचे विद्यार्थी तसेच होमगार्ड विभाग, अग्निशामक विभाग आणि क्रीडा विभागाने सहभाग नोंदवला होता. ही महा मॅरेथॉन रॅली वन विभागाचे श्री सिद्धेश्वर वनविहार ते विनायक सांस्कृतिक भवन या दरम्यान आयोजित करण्यात आली होती.

महा मॅरेथॉन रॅली समारोप प्रसंगी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी या मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात येते, अशावेळी माणसाचे मन आणि शरीर नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी तंदुरुस्त आणि खंबीर असायला हवे. तसेच त्यांनी या रॅलीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि विद्यार्थिनींचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या व प्रथम क्रमांक विजेती विद्यार्थिनी राजश्री नगाले आणि विध्यार्थी चंदू राठोड यांना प्रमाणपत्र, मेडल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, राजू प्याटी, सुनील पवार यांनी या महा मॅरेथॉन रॅलीमध्ये पंच म्हणून काम पाहिले.

# वीरतपस्वी शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** वीरतपस्वी शिक्षण संकुल एमआयडीसी येथे भारताचा 78 वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनानंतर काशी पिठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रशालेत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते आर एस पी व स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संचालन केले ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका अनुराधा गंगुल यांनी 'देश रंगीला' हे देशभक्तीपर गीत सादर केले यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. संकुलात इयत्ता पहिली ते बारावी डी टी एड, बीएड या वगातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. स्वातंत्र्यदिनी वाढदिवस असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन शुभेच्छा देण्यात आल्या देशभक्ती गीतावर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी संस्थेचे संचालक शिवानंद पाटील, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, प्राचार्य डॉ राजशेखर हिरेमठ, लक्ष्मी पाटील, लक्ष्मी कंदीकटला, केदारनाथ बचाटे, धनंजय नकाते, संतोषकुमार तारके व बहुसंख्य पालक उपस्थित होते सांस्कृतिक विभाग प्रमुख केदार पटणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# महसूल खात्यात काम करताना माणसे वाचता आली पाहिजेत - शेखर गायकवाड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाच्या अनेक विभागापैकी महसूल विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाच्या सर्वसामान्य लोकांशी दैनंदिन संबंध येतात. तसेच प्रशासकीय स्तरावर महसूल विभाग अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने सर्व यंत्रणाच्या समन्वयाचे काम येते. त्यामुळे अशा विभागात काम करत असताना माणसे वाचता आली पाहिजेत. कामाचा आनंद घेता आला पाहिजे. जो अधिकारी कर्मचारी हे काम करेल त्याची महसूल विभागातील सेवा उत्कृष्ट असेल, असे प्रतिपादन पुणे येथील यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांनी केले.





महसूल पंधरवडा निमित्त रंगभवन सभागृह येथे आयोजित सांगता समारोप कार्यक्रमात गायकवाड मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह होत्या. तर निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडल अधिकारी, तलाठी, महसूल सहायक, अव्वल कारकून, शिपाई, वाहनचालक तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने दि. 01 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट दरम्यान महसूल पंधरवढा सर्व तहसिल कार्यालये उपविभागीय कार्यालये व जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांमध्ये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून यशदचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड हे सपत्नीक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्रीमती मनिषा कुंभार यांनी पंधरवडयातील केलेल्या कामांची माहिती सांगितली, तसेच महसूल विभाग हा शासनाकडून दिल्या गेलेल्या सर्व जबाबदाऱ्या समर्थपणे पेलत असल्याने शासनाच्या सर्व महत्वाच्या योजना राबवण्याची जबाबदारी आवर्जुन महसूल खात्याकडे दिली जाते. याचा सर्व महसूल विभागाना सार्थ अभिमान आहे. या महसूल पंधरवाड्यात मा. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी महसूल पंधरवाडा यशस्वी होण्यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन केले व महसूल कार्यालयांनी अंमलबजावणी केली असल्याचे सांगितले.

महसूल पंधरवड्यानिमित्त आयोजित स्वच्छ सुंदर कार्यालय या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यात मोहोळ तहसिल कार्यालयाला तहसिल स्तरावर, उपविभागीय अधिकारी कार्यालय, माळशिरस, अकलूज यांना उपविभाग स्तरावर तर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखा यांना जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरील सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक देण्यात आला. त्यानंतर सर्वोत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

तहसिलदार संवगार्तील सर्वोत्कृष्ट ठरलेले मंगळवेढा तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, उपविभाग माळशिरस तसेच विविध जिल्हास्तरिय विविध संघटनांचे अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर सोलापुरच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले व येणाऱ्या प्रत्येक नागरिकांशी सौजन्याने व सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वर्तन केले पाहिजे अशा मौलिक सूचना दिल्या.

महसूल विभागातील कर्मचारी / अधिकारी यांच्या 10 वी व 12 वी तील उत्कृष्ट गुण मिळवलेल्या पाल्यांचा सत्कार सोहळा पार पडला.

**रंग महसुली या पुस्तकाचे प्रकाशनः**

शेखर गायकवाड लिखित "रंग महसुली" या महसूल खात्यात काम करताना भेटलेल्या बहुरंगी व्यक्तिमत्व असलेल्या लोकांचे किस्से असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांचे हस्ते करण्यात आले. महसुली अधिकारी यांचे समक्ष पुस्तक प्रकाशन करण्याचा शेखर गायकवाड सरांचा मानस होता, ती संधी सोलापूरच्या महसूल विभागाला मिळाल्याचा आनंद सर्वांनी व्यक्त केला.

यावेळी शेखर गायकवाड यांनी आपल्या भाषणातून सर्व उपस्थित महसूली अधिकारी कर्मचारी यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच महसूल खात्यात काम करताना माणसं वाचता आली पाहिजेत तसेच कामाचा आनंद घेता आला पाहिजे अन्यथा काम फार एकसुरी होईल अशा भावना व्यक्त केल्या. आपल्या भाषणामध्ये आपल्या कारकीर्दीतील अनेक किस्से आपल्या खास शैलीमध्ये त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती मनिषा कुंभार तर सुत्रसंचालन अमृत नाटेकर यांनी केले.

सर्वात शेवटी उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी आभार व्यक्त केले. व महसूल प्रशासनाने यशस्वी केलेल्या महसुली पंधरवड्यास संपूर्ण जिल्ह्यातून महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परीक्षेत यश मिळवलेल्या यशस्वितांनी अन्य विद्यार्थ्यांना दीपस्तंभागत मार्गदर्शन करावे

## बांधकाम उद्योजक खाजाभाई शेख यांचे प्रतिपादन पोलीस भरतीमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मोहोळमध्ये सन्मान

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवल्यानंतर आपल्या जन्मभूमीचे ऋण न विसरता इतर विद्यार्थ्यांनाही परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करून सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन मोहोळ येथील प्रख्यात उद्योजक खाजाभाई शेख यांनी केले.



मोहोळ येथील शाहीर विश्वासराव फाटे संस्कृती भवनमध्ये निवृत्त सैनिक राजाराम शिंदे यांच्या संकल्पनेतून वंदे मातरम संस्था आणि अकॅडमीच्या वतीने पोलीस आणि तलाठी परीक्षेमध्ये उज्वल यश मिळवलेल्या मोहोळ शहर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खाजाभाई शेख बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योजक धनराज फाटे, ढोकबाभूळगावचे माजी सरपंच बंडू मुळे, इत्यादीसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी पोलीस भरतीच्या सरावासाठी साडेचार एकर क्षेत्र कोणतीही भाडे शुल्क न आकारता सामाजिक जाणीवेतून उपलब्ध करून दिल्याबद्दल खाजाभाई शेख यांचा सन्मान राजाराम शिंदे यांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी पोलीस भरती परीक्षेमध्ये यश मिळवलेले वैभव यजगर, आकाश लिंगे, सुरज माने, संजय वाघमोडे, फारुख मुजावर, ओंकार हाके, सुनील शिंदे, राहुल मळगे, आकाश शेळके आणि तलाठी परीक्षेत यश मिळवल्याबद्दल दिशा सातपुते यांचा यथोचित सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**Classified - छोटी जाहीरात**

**विक्री**

विविध डिझाईनचे फॅशनेबल स्ट्रेचेबल ब्लाउज विक्रीसाठी उपलब्ध. रेडिमेड ब्लाउज विक्रीचे प्रसिद्ध शॉप. रसगंध लेडीज वेअर, नवी पेठ, दिवेकर बेकरी समोर, सोलापूर

**मो - 9890232227**

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.

**संपर्क:** **9881361260**

**विक्री**

**गौरी व गणपती सण आनंदित होण्यासाठी जगदंब फॅमिलीच्या वतीने आसरा चौक कोकण फॅमिली टेरेस मध्ये गिफ्ट रोपं तसेच राजस्थान भागातील कलर दगड चे प्रदर्शन व विक्री संपर्क**

**९८५०२३९९९८**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 **सर्टीफाईड कंपनी**

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, मार्केटींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.

संपर्क: **9591409911 / 9272021110**

**R.K कन्स्ट्रक्शन्स**



इं. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)

# मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र व्यक्तींनी नाव नोंदणी करावी : संजय यादव

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार जिल्ह्यात 6 ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. दि. 1 जुलै 2024 रोजी वयाची 18 वर्ष पूर्ण होणाऱ्या व मतदार यादीत अद्यापपर्यंत नाव न नोंदविलेल्या नागरिकांनी त्वरित आपले नाव मतदार यादीत नोंदवून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांनी केले आहे.

दि. 1 जुलै 2024 या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (2) मुंबई शहर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात विशेष मोहीमेव्दारे राबविण्यात येत आहे. प्रारूप यादीमध्ये मतदारांनी आपले नाव आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीमध्ये नाही अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते. तसेच मतदारांनी आपले नाव, पत्ता, लिंग, जन्म दिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इत्यादी तपशील देखील अचूक असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे.

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



**दारू... अंमली पदार्थ...**
**गॅरंटेड सुटण्यासाठी...**



**व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..**
**(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)**

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**


**फोन: 9552619752**

**कॉल / व्हॉटस्अॅप करा...**
**दारू... अंमली पदार्थ...**
**राम राम करा...**

**501% रिझल्ट**

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे क्र. १०१



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

**शब्दकोडे क्र. १०० चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हा | रा | ष्ट्र | ■ | उ | त्त | र | प्र | दे | श | ■ |
| स | र | स | ■ | मा | ता | ■ | स | हा | ■ | ह | र |
| ल | ■ | ■ | का | स | व | ■ | द | र | बा | र | ■ |
| त | फा | व | त | ■ | ळा | ■ | ■ | ■ | रा | ■ | ना |
| ■ | र | सा | ■ | म | न | मो | ह | न | ■ | सी | ता |
| ■ | ■ | ह | त्ती | ■ | व | ■ | य | व | त | मा | ळ |
| प | रा | त | ■ | वा | रा | ■ | ग | रा | ■ | दे | ■ |
| ट | ■ | ■ | वा | ई | ■ | वा | य | ■ | ध | व | न |
| क | ड | क | डा | ट | ■ | स | ■ | स | ब | ■ | र |
| न | र | म | ■ | ■ | ग | रू | ड | ■ | ध | म | क |
| ■ | पो | ल | ■ | पा | र | ■ | ब | ल | वा | न | ■ |
| ए | क | ■ | म | ल | म | ■ | र | स | ■ | न | ऊ |

# एम.के.फाऊंडेशन तर्फे शिवदारे प्रशालेत वह्या वाटपाचा कार्यक्रम

## सहकार क्षेत्रातील कार्यामुळेच वि गु शिवदारे यांना सहकारमहर्षी म्हणून लोक सन्मानित करत असत- महादेव कोगनुरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सहकारमहर्षी स्वर्गीय विरुपक्षप्पा गुरप्पा शिवदरे यांना लोक प्रेमाने शिवदारे आण्णा म्हणून ओळखत होते. एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व थोर सामाजिक कार्यकर्ते म्हणून शिवदारे आण्णा हे परिचित होते. आण्णांच्या या सहकार क्षेत्रातील योगदानामुळेच लोक त्यांना सहकारमहर्षी म्हणून सन्मानित करत असल्याचे मत एम के फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा जनसेवक महादेव कोगनुरे यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

सहकारमहर्षी वि गु शिवदारे यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त इंगळगी (ता दक्षिण सोलापूर) येथील वि गु शिवदारे प्रशालेत एम.के.फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा जनसेवक महादेव यांच्या तर्फे वह्या वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी महादेव कोगनुरे हे बोलत होते.

प्रथमता वि गु शिवदारे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून एम.के.फाऊंडेशन चे संस्थापक तथा सागर सिमेंट चे मुख्य व्यवस्थापक महादेव कोगनुरे यांच्या हस्ते शिवदारे आण्णांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संभाजी माने हे उपस्थित होते. यावेळी उपाध्यक्ष इनोंदगी कोटे, सचिव चंद्रकांत गुरव, संचालक यल्लपा कोरे, श्रीशैल देशमुख, विजयकुमार बरबडे, सरपंच विनोद बनसोडे, उपसरपंच प्रतिनिधी प्रधान गुरव, युवक काँग्रेसचे अध्यक्ष मौलाली शेख, नूरअहमद बागवान भीमाशंकर बंदीछोडे, गोरख राऊत, मुख्याध्यापक नेल्लुरे, शिक्षक कनोजी सर,व शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



पुढे बोलताना महादेव कोगनुरे यांनी वि गु शिवदारे आण्णांच्या राजकीय व सहकार प्रवास विषयी आपले विचार व्यक्त करीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द,चिकाटी व अभ्यासूवृत्तीने वाटचाल करणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच यावेळी दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे महादेव कोगनुरे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.यामध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी गुरव, द्वितीय क्रमांक जैतुन शेख, तृतीय क्रमांक पायल गाडेकर यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन म्हमाणे सर तर आभार श्रीमती वंजारी यांनी मानले.

# कुमठे प्रशाला कनिष्ठ महाविदयालयात साजरा झाला आगळावेगळा स्वातत्र्यदिननिमित्त केला गूनीजनांचा गौरव; दत्ता मामा मुळे यांचे गौरोदगार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविदयालयात भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करन्यात आला या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन बिल्डर असोसोसीएशनचे प्रदेश अध्यक्ष दत्ता मामा मुळे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांनी भुषविले या प्रसंगी संस्थेचे सचीव नागनाथ माने विश्वस्त स्वातीताई माने कुमठे केंद्राचे केंद्र प्रमुख सिद्राम वाघमोडे सर, ब्रह्मदेव दादा माने बॅकेचे संचालक तानाजी शिनगारे, राजु मायनाळे, प्रकाश काशीद, मल्लीनाथ कोरे, एसपीएम च्या प्राचार्या रोहिणी चव्हाण, रार्ष्टविकास प्राथमिकच्या मुख्याध्यापिका मंगला मोरे, लिटर स्टिर च्या प्रिन्सपल शुभांगी पवार, उपस्थीत होते या कार्यक्रमाचे प्रास्तिवीक कुमठे प्रशालेचे प्राचार्य जयसिंग गायकवाड यांनी केले या प्रसंगी दत्ता मुळे यांनी ब्रम्हदेव माने दादा यांनी उभी केलेली ही संस्था आज सोलापुर जिल्हयातील एक आदर्श शिक्षण संकुल म्हणुन नावारुपाला आलेली आहे. सक्षम देशासाठी सक्षम पिढी खुप महत्वाची आहे ती सूसंस्कारित पिढी घडवीन्याचे काम या शिक्षण संकूलातुन केले जाते आज जिल्यात विविध सामाजिक शेक्षणिक कार्यात अग्रेसर संस्था म्हणुन शिक्षण प्रसारक मंडळ कुशठे हे आहे असे मत या ध्वजारोहन प्रसंगी दत्ता मुळे यांनी मांडले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुवर्णा धारेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमठे प्रशालैचे पर्यवेक्षक वसंत गुगे यांनी मानले कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली या कार्यक्रमाला कुमठे व परिसरातील पालक मोठया संखेनी उपस्थीत होते.



# टप्प्यावरील शिक्षकांचे वेतन अनुदानाअभावी रखडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील अंशतः अनुदानित प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे जुलै महिन्याचे वेतन अनुदानाची तरतुद नसल्यामुळे रखडल्याची माहिती डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली.



अंशतः अनुदानावर कार्यरत शिक्षकांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे वेतन अदा करण्यात आले नाही.हा सबंधित शिक्षकांवर अन्याय आहे.निधीची तरतुद करुन वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्यात यावा.

**– सुनिल चव्हाण,** प्रदेश महासचिव डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद

डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,युवक शिक्षक संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेच्यावतीने अंशतः अनूदानित शिक्षकांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी शिक्षण संचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या निवेदनावर आप्पासाहेब पाटील, विनोद आगलावे, आप्पाराव इटेकर, अ.गफुर अरब यांच्या सह्या आहेत. या निवेदनाची प्रत माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनाही देण्यात आली आहे. ऑगस्टचा निम्मा महिना संपला आला तरी वेतनाचा अद्याप पत्ता नाही.वेतनासाठी शासनाने अनुदानाची तरतुद केली नाही. जिह्यातील ३० ते ३५ शाळेतील जवळपास २०० शिक्षक अंशतः अनुदानावर कार्यरत आहेत.जुलै महिन्याचे वेतन, वार्षिक वेतनवाढ यापासुन शिक्षक वंचित राहीले आहेत. अनेक वर्षे विनावेतन काम केल्यानंतर, मुल्यांकनाच्या जाचक अटीची पुर्तता करुन शाळा अनुदानास पात्र ठरल्या आहेत. यातील काही शाळा २०%, ४०% व ६०% अनुदानास पात्र ठरल्या आहेत.अनेक वर्षाच्या प्रतिक्षेनंतर मिळणारे तुटपुंजे वेतन ही वेळेवर होत नसल्याने शिक्षकांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.वेतन वेळेवर होण्यासाठी शासनाकडुन वेतन अनुदान वेळेवर वितरित होणे गरजेचे आहे.निम्मा महिना संपला तरी अनूदानाची तरतुद झाली नाही. माध्यमिकच्या अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वेतनासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे. त्यांचे वेतन खात्यावर जमा झाले आहे. प्राथमिक विभागासाठी निधी उपलब्ध न केल्यामुळे अंशतः अनुदानावर कार्यरत शिक्षक वैतागले आहेत. ऐन सणासुदीच्या दिवसात वेतन न झाल्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे. निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन वेतनाचा प्रश्न सोडविण्यात यावे. अशी मागणी शिक्षकांमधुन होत आहे. अंशतःअनुदानित शिक्षकानी वेतनाच्या निधीबाबत शिक्षक आमदारांना भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे संबंधित शिक्षकांनी सांगितले.

# अजित पवार हे राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत...

## श्री सिद्धरामेश्वर मंदिरात सुरेश पालवे यांच्या हस्ते महापूजा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या गटासह महाराष्ट्राच्या सत्तेत सहभागी झाले अजित पवार महायुतीत गेल्यापासून ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील असा दावा सातत्याने वेगवेगळ्या पक्षातील किंवा त्यांच्याच नेत्याकडून केला जात आहे अजित पवारांनी विरोधी पक्षांमधील नेते असो अथवा अजित पवारांचे समर्थक अनेकांनी अजित पवार लवकरच मुख्यमंत्री होतील असा दावा केला आहे. याच पार्श्वभूमीवर पवित्र श्रावण निमित्ताने सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरात सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बारामती विधानसभा निरीक्षक सुरेश पालवे यांच्या हस्ते अजित पवार हे महाराष्ट्र राज्याचे भावी मुख्यमंत्री व्हावेत यासाठी त्यांनी सिद्धरामेश्वर यांच्या चरणी नतमस्तक होऊन महापूजा व महाआरती केली.



याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य किसन जाधव, शिवराज जाधव, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, प्रांतिक सदस्य महेश निकंबे माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, किरण शिंदे, शहर मध्य राष्ट्रवादी कार्याध्यक्ष शोभा गायकवाड, शहर उपाध्यक्ष प्रमिला स्वामी, सरोजनी जाधव, संगीता गायकवाड, संगीता बिराजदार, माणिक कांबळे, हुलगप्पा शासम, वसंत कांबळे, महादेव राठोड यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना पालवे म्हणाले की अजित पवार हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व्हावे ही सर्वसामान्यांची भावना आहे आम्ही यावर्षी प्रत्यक्षात उतरवू या संकल्पसह घड्याळ तेच वेळ नवी आणि अजितपर्व यासाठी कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत.

आज ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या चरणी नतमस्तक होऊन साकडं घालत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून अजित पवार हे विराजमान व्हावेत हे सर्वसाधारण कार्यकर्त्यांची आणि राष्ट्रवादी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची भावना असल्याचे ते म्हणाले. यावेळी बारामती विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक सुरेश पालवे किसन जाधव, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अन्नछत्रांमध्ये महाप्रसादाचा लाभ घेतला

# वाकावमध्ये आकार घेतोय ऑक्सिजन पार्क

## युवा सरपंच ऋतुराज सावंत यांचा पर्यावरणपूरक उपक्रम

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील वाकाव गावातील स्मशानभूमीत व गायरान जमिनीमध्ये सहाशे झाडांचा ऑक्सिजन पार्क साकारण्यात येत असुन वाकावचे युवा सरपंच ऋतुराज सावंत यांच्या संकल्पनेतुन हा पर्यावरणपुरक उपक्रम समोर आला असुन ६०० हुन अधिक झांडामुळे हा परिसर आता हिरवाईने नटणार आहे.

स्मशानभूमीकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन नकारात्मक असतो. मात्र गावातील नागरिकांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत यांनी भैरवनाथ शुगरचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव सावंत व माजी पंचायत समिती सदस्य पृथ्वीराज सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व कल्पकतेतून स्मशानभूमीसुद्धा ऑक्सिजन पार्कयुक्त होत आहे.

दोन हजार ३७ लोकसंख्या असलेल्या वाकाव गावात दोन एकर गायरान जागेतील स्मशानभूमीत सहाशे फळझाडे, फुलझाडे, वेली व औषधी झाडांचा ऑक्सिजन पार्क सुरू आहे.

गावाचे प्रयोगशील सरपंच ऋतुराज सावंत यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकांदे, गटविकास अधिकारी महेश सुळे, विस्तार अधिकारी डी. जी.सुतार, ग्रामविकास अधिकारी संजय क्षिरसागर, उपसरपंच प्रियंका कदम, ग्रामपंचायत सदस्य किर्ती बोधले, धनश्री कोकाटे, राधाबाई सावंत, माणकोजी भुसारे, भारत खंडागळे, अनुसया कुंभार, बजरंग गोसावी यांच्याशी चर्चा करून ग्रामस्थांसाठी स्वच्छ हवा, फिरण्यासाठी ठिकाणी व युवकांना व्यायामासाठी सुसज्ज मैदान व झाडा फुलांनी युक्त ठिकाणी असावे म्हणून ऑक्सिजन पार्कची निर्मिती करण्याबाबत चर्चा केली. यातून सहाशे झाडांचा ऑक्सिजन पार्क आकार घेत आहे.





गावात मुलभूत सोयी सुविधा असून या सोयी सुविधांबरोबरच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही काम करण्याची गरज असल्याने ऑक्सिजन पार्क तयार करण्याची संकल्पना समोर आली.माझे सर्व सहकारी सदस्य व ग्रामस्थांच्या सहकायार्तून पर्यावरण रक्षण व संवर्धनाचे काम केले आहे.भविष्यात येथे जॉगिंग ट्रॅक, व्यायामशाळा, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करण्यासह नाविन्य पुर्ण उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे.

**– सरपंच ऋतुराज सावंत** (वाकाव)



सरपंच ऋतुराज सावंत यांनी ऑक्सिजन पार्कबाबत मांडलेली संकल्पना मूर्त रूपात आणून झाडांचे दीर्घकाळ संवर्धनासाठी सुरूवातीला दोन एकर क्षेत्राला कंपाऊंड केले. यामुळे झाडांचे संरक्षण करणे सोपे झाले. झाडांना दैनंदिन पाणी घालण्याची कटकट घालविण्यासाठी ठिबक सिंचनची सुविधा केली. यामुळे वृक्ष संगोपन व संरक्षण या दोन्ही गोष्टी साध्य होताना दिसत आहेत.

**–संजय क्षिरसागर,** ग्रामविकास अधिकारी वाकाव

वृक्ष संवर्धनासाठी दोन एकराला तारेचे कंपाउंड केले. दोन एकरातील चिलारी व काटेरी झुडपे काढून जमीन सपाट केली व प्रत्येक दहा फुटांवर एक झाड लावले आहे. सर्व झाडांसाठी दोन एकरात ठिबक सिंचनची सुविधा करण्यात आलेली आहे. जुलै महिन्यात या ठिकाणी बकुळ, मुसंडा, सावर, सिल्व्हर ओक, करंज, पाम, फायकस, कोनोकॉर्पस, टर्मेलिया, कदंब, बहावा, पळस, बेहडा, वड, पिंपळ, कडुलिंब, जांभूळ, शंकासुर यासारखी विविध सहाशे रोपे लावली आहेत. दोन झाडांमध्ये प्रत्येकी दहा फुटांचे अंतर ठेवले आहे. त्यामुळे या ऑक्सिजन पार्कमधील रोपांची उत्तम वाढ झाली आहे. हे काम ग्रामनिधी पंधरावा वित्त आयोग योजनेतून केले आहे. या पार्कच्या उभारणीसाठी ग्रामपंचायत कर्मचारी रणजित कारंडे, संजय ढेरे, नाना शेलार,आकाश नागटिळक, सयाजी सावंत, तेजस कोकाटे, हरी सावंत, संदीप सावंत, अच्युत सावंत, विक्रम कदम, गणेश राऊत, अमोल कोकाटे, सोनू बोधले, शरद शिरसट, विक्रम मुसळे यांचे सहकार्य लाभले.

# पंढरपूर येथे दर्शन मंडप व स्काय वॉकसाठी 110 कोटीच्या आराखड्याला उच्च अधिकार समितीची मान्यता

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी लाखो भाविक दरवर्षी येत असतात. तसेच आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्र या मोठ्या वाऱ्यांना दहा ते वीस लाख भाविक दर्शनासाठी येतात व रांगेत उभे राहतात. वर्षभरात जवळपास एक कोटी भाविक पंढरपूर येथे येतात. सध्याची दर्शन रांग व्यवस्था अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे दर्शन मंडप व स्काय वॉक या माध्यमातून भाविकांना सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने 129 कोटीचा आराखडा तयार केलेला होता. या अनुषंगाने दिनांक 16 ऑगस 2024 रोजी राज्याच्या मुख्य सचिव सुनिता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील उच्च अधिकार समितीच्या बैठकीत दर्शन मंडप व स्काय वॉक साठी 110 कोटी चा आराखडा समितीने मंजूर केलेला आहे.

मुंबई येथे झालेल्या उच्च अधिकार समितीच्या बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासह जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक जिल्हा नियोजन अधकारी पुंडलिक गोडसे उपस्थित होते.

श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्शन रांगेत जास्त वेळ उभे राहू नये व रांगेत भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी मागील अनेक वषार्पासून दर्शन मंडप व स्काय वॉक तयार करण्याबाबत प्रयत्न सुरू होते. हा अनेक वषार्पासून प्रलंबित असलेला व भाविकांसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर येथे पदभार घेतल्यापासून पाठपुरावा सुरू केला.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यामध्ये कोणत्याही भाविकाला दर्शन रांगेत त्रास होऊ नये या अनुषंगाने सर्व सोयी सुविधा रांगेत उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेले होते. त्यानुसार पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर व सोलापूर जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी यांनी सर्व सोयी सुविधांनी युक्त असलेला 129 कोटीचा आराखडा कार्यकारी समितीला सादर केला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीने या आराखड्याला मान्यता प्रदान केली. त्यानंतर हा आराखडा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीत सादर करण्यात आला व या समितीनेही या आराखड्याला मान्यता दिली.

जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिलेला दर्शनमंड व स्काय वॉक आराखडा पुढील मान्यतेसाठी राज्याच्या मुख्य सचिव सुनिता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील उच्च अधिकार समितीकडे पाठवण्यात आला. दिनांक 16 ऑगस्ट 2024 रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधकार समितीने जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिलेला 129 कोटीचा आराखडा सविस्तरपणे पाहून त्यातील 110 कोटीला मान्यता दिलेली आहे. उच्चाधिकार समितीने मान्यता दिल्यानंतर माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सदस्य आसलेल्या राज्य शिखर समितीकडे हा आराखडा सादर केला जाईल. साधारणतः सप्टेंबर महिन्याच्या मध्यापर्यत राज्य शिखर समितीचे बैठक होऊन पंढरपूरच्या दर्शन मंडप व स्काय वॉक आराखड्यास अंतिम मान्यता मिळेल व त्यानंतर लवकरच शासन निर्णय निघेल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

**दर्शन रांगेतील सुविधा–**

दर्शन रांगेत भाविकांसाठी पिण्याचे पाणी, शौचालयाची सुविधा, वेटिंग हॉल, दर्शनासाठी टोकन घेण्याची सुविधा, रिफ्रेशमेंट, आपत्तीमध्ये बाहेर पडण्याची व्यवस्था, हिरकणी कक्ष, दिव्यांगासाठी सुविधा, अग्नि विरोधक सुविधा, पोलीस, जेवणाची व्यवस्था, पार्किंगची सुविधा या बाबींचा समावेश आराखड्यात करण्यात आलेला आहे.

# जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यावर 14 ऑगस्ट पासून पैसे जमा होण्यास सुरुवात

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी व त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी पात्र महिलांसाठी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा"राज्यस्तरीय शुभारंभ शिवछत्रपती क्रिडा संकुल बालेवाडी, पुणे येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. याचे थेट प्रक्षेपण हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर येथे झाले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते या योजनेचा लाभ मंजूर झालेल्या महिला लाभार्थ्यांना तसेच या योजनेचे अर्ज भरणारे ऑपरेटर यांना प्रतिनिधिक स्वरूपात सन्मानपत्र देण्यात आले.



यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, जिल्हा परिषदेचे महिला बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, विधानसभा क्षेत्र निहाय स्थापन केलेल्या समित्यांचे अध्यक्ष व सदस्य तसेच सोलापूर जिल्ह्यातील सातशे ते आठशे महिला लाभार्थी उपस्थित होत्या.

सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यापासून ग्रामीण पातळीपर्यंत प्रचार प्रसिद्धी करून ही योजना प्रशासनाने प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचवली यामुळे जिल्ह्यात आज रोजी पर्यंत सहा लाख 14 हजार 700 अर्ज प्राप्त झालेले असून विधानसभा क्षेत्र निहाय समित्यांनी त्यातील 5 लाख 94 हजार 587 अर्ज मंजूर केलेले आहेत. दिनांक 14 ऑगस्ट 2024 पासून या योजनेत अर्ज मंजूर झालेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झालेली आहे.

तालुका निहाय अर्ज मंजूर झालेली संख्या पुढीलप्रमाणे. अक्कलकोट 45 हजार 148, बार्शी 55 हजार 421, करमाळा 33 हजार 635, माढा 43 हजार 247, माळशिरस 66 हजार 254, मंगळवेढा 34 हजार 258, मोहोळ 39 हजार 848, उत्तर सोलापूर 1लाख 6 हजार 581, पंढरपूर 64 हजार 780, सांगोला 42 हजार 930 व दक्षिण सोलापूर 62 हजार 485.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत 14 ऑगस्ट रोजी माज्या बँक खात्यावर 3000 रू जमा झाले. याबद्दल मी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब व शासनाची खूप खूप आभारी आहे. माज्यासारख्या लाखो बहिणीच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्त्वाची आहे. बँक खात्यावर पैसे जमा झाल्याने खूप खूप समाधान आहे. ही योजना अशीच निरंतर सुरू राहावी.

**– सौ.भाग्यश्री कोळी,** सोलापूर

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा दिनांक 4 जुलै 2024 रोजी नारीशक्ती दूत ॲपवर ऑनलाईन अर्ज भरला होता. मुख्यमंत्री महोदय दोन महिन्याचे पैसे तुमच्या खात्यावर जमा होतील असे वारंवार सांगत होते. त्यांचे म्हणणे खरे ठरले व 15 ऑगस्ट रोजी माज्या खात्यावर दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा झाले. त्याचा मला खूप खूप आनंद झाला आहे ही योजना अशीच निरंतर सुरू ठेवावी यातून माज्या कुटुंबाचा खर्च भागवण्यास मला मदत मिळणार आहे. मुख्यमंत्री महोदय व राज्य शासनाचे मी व माज्यासारखे अनेक बहिणी आभार व्यक्त करत आहेत.

**– सौ. अंजली बसवराज बेंचे,** सोलापूर

### योजनेअंतर्गत आज अखेरपर्यंत प्रशासनाने केलेली कार्यवाही

1.सर्व अंगणवाडी सेविका, अंगणवाडी पर्यवेक्षिका व बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे योजनेबाबत (अर्ज स्विकृती, ऑनलाईन अर्ज भरणे, छाननी बाबत प्रशिक्षण घेतले)2. सर्व अंगणवाडी केंद्रांवर, ग्रामपंचायत कार्यालयासत योजनेचे अर्ज उपलब्ध करून दिले. 3. पालखी मार्गावर / वारी मार्गावर हिरकणी कक्षाच्या माध्यमातून योजनेचे मोठे बॅनर लावून प्रचार व प्रसिध्दी केली. 4. ग्रामपंचायत स्तरावर अर्ज भरणे आधार कार्ड अपडेट करणे बँक खाते उघडणे याबाबत शिबीरांचे आयोजन केले. 5. मंडल स्तरावर उत्पन्न दाखला रेशन कार्ड अपडेट करणे याबाबत शिबीरांचे आयोजन६. आपले सरकार सेवा केंद्र, सेतू सुविधा केंद्र यांचे ऑनलाईन अर्ज भरणेबाबत प्रशिक्षण घेतले. 7. जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत योजनेबाबत सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, बालविकासअधिकारी यांची नियमित आढावा सभा घेवून योजनेच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन करणेत आले. ८. शासनामार्फत प्राप्त झालेले प्रचार, प्रसिध्दी साहित्य जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत क्षेत्र, ग्रामपंचायत यांमध्ये 48 तासांच्या आत लावणेबाबत सूचना दिलेल्या आहेत व त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. 9. दिनांक 20 जुलै 2024 रोजी योजनेच्या जनजागृतीबाबत तसेच अपूर्ण प्राप्त अर्ज त्रुटी पूर्तता तसेच 100% लाभार्थी यांचे अर्ज भरून घेण्याच्या उददेश्याने महिलांच्या विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले. 10. अर्ज स्विकारणेसोबतच आधार सिडींग असलेची खातरजमा करणेची कार्यवाही आपले सरकार कर्मचारी व अंगणवाडी सेविका यांचेमार्फत सुरु आहे. 11. ग्रामस्तरीय समिती स्थापन करणेबाबत सूचना दिल्या असून दर शनिवारी पात्र लाभार्थ्यांच्या यादीचे चावडीवर वाचन करण्यात येत आहे व अपूर्ण कागदपत्रांची त्रुटी पूर्तता करण्यात येणार आहे. यामुळे जिल्हाभरातून या योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला व 6 लाख 14 हजार 700 अर्ज प्राप्त झाले असून पैकी 5 लाख 94 हजार 587 अर्जांना मंजुरी देण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा त्यांच्या बँक खात्यावर थेट पंधराशे रुपये जमा होणार आहेत या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर दिनांक 14 ऑगस्ट 2024 पासून थेट दोन महिन्याचे तीन हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झालेली आहे.